Paytm Payments Bank

udyojak.org fb.com/smartudyojak

# स्मार्ट उद्योजक

वर्ष : ४ अंक : ११ । मुंबई । जानेवारी - २०१९ । पृष्ठ : २६ । मूल्य : ₹२०/-

## आता व्यापार करेल आणखी सोपा

## आपली पेयमेंट बँक

airtel Payments Bank






AVIRAT™
Finest Authentic Spices

| | | |
|---|---|---|
| * मालवणी मसाला | * चाट मसाला | * पाणीपुरी मसाला |
| * घाटी मसाला | * छोले मसाला | * बिर्याणी मसाला |
| * फ्राय मसाला | * सांबार मसाला | * किचन किंग |
| * गरम मसाला | * पावभाजी मसाला | * मिरची पावडर |
| * गोडा मसाला | * मिसळ मसाला | * धणे पावडर |
| * आगरी मसाला | * दाबेली मसाला | * हळद पावडर |
| * गोवन मसाला | * चहा मसाला | यासह विविध पिठे व |
| * सब्जी मसाला | * काढा मसाला | रेडी-टू-कुक मिक्स |

## * उद्योगसंधी *

## कमीशन तत्त्वावर अविरत मसाले विक्रीसाठी उपलब्ध

संपर्क : अनुराधा माने - ९८६९९८९६६१

# आता व्यापार करेल आणखी सोपा आपली ‘पेयमेंट बँक’




व्यवसाय सुरू करताना सगळ्यात पहिले आपण कशाच्या मागे लागतो तर बँक खाते उघडण्याच्या. इव्हन असे बरेच छोटे व्यापारी व उद्योजक असतात ज्यांना व्यवसायाची नोंदणी करायची असते ती फक्त व्यवसायाच्या नावाने बँक खातं काढता यावं म्हणून. म्हणजे सीताराम माळी नावाच्या एका उद्योजकाने ‘सीताराम मिल्क सर्व्हिस’ नावाने दूध वितरणाचा व्यवसाय सुरू केला. तो ग्राहकाकडे गेल्यावर ग्राहक त्याला पहिले विचारणार चेक कोणत्या नावाने बनवायचा? स्वत:च्या नावावर चेक घेतला तर ते प्रोफेशनल वाटणार नाही आणि ‘सीताराम मिल्क सर्व्हिस’च्या नावे

**स्मार्ट उद्योजक**

RNI No: **MAHMAR/2015/64164**

संपादक : शैलेश राजपूत
कार्यकारी संपादक : प्रतिभा राजपूत
कर्मचारी : भरत खोराटे
प्रियांका सुतार
मुद्रितशोधन : संजीव उपरे

**प्रिंट वर्गणी**
वार्षिक : ५०० त्रैवार्षिक : १३००
पंचवार्षिक : २०००

**डिजीटल वर्गणी**
वार्षिक : १२५

कार्यालय : १११, मास्टरमाइंड-४, रॉयल पाल्म्स, आरे कॉलनी, गोरेगाव (पूर्व), मुंबई - ४०००६५.
दूरध्वनी : ९१३६०९६०१४
संकेतस्थळ : *www.udyojak.org*
ई-मेल : *smartudyojak@gmail.com*

*अंकातील जाहिरातींबद्दल योग्य ती शहानिशा करून व्यवहार करावा. ‘स्मार्ट उद्योजक’ मासिकावर यापैकी कोणत्याही व्यवहारांची जबाबदारी नसेल.*

**वर्गणीदार होण्यासाठी udyojak.org/subscribe वर जा.**

कोणी चेक दिला, तर तो वटवायचा कसा? परंतु बँकेत खाते काढणे हा एक स्वतंत्र संघर्ष असतो.

आता या संघर्षावर तोडगा निघाला आहे, तो म्हणजे आपल्या प्रत्येकाला घरच्या घरी खाते उघडता येऊ शकणाऱ्या पेयमेंट बँका. रिझर्व्ह बँकेने अधिकाधिक लोकांना बँकिग क्षेत्राच्या परिघात घेण्यासाठी काही पेयमेंट बँकांना परवागनी दिली आहे. ‘एअरटेल’ या दूरसंचार क्षेत्रातील अग्रगण्या कंपनीने ‘एअरटेल पेयमेंट बँक’ ही भारतातील पहिली पेयमेंट बँक सुरू केली. त्यापाठोपाठ ‘पेटीएम’ या मोबाइट वॉलेट कंपनीने ‘पेटीएम पेयमेंट बँक’ सुरू केली. याशिवाय ‘फिनो’, ‘आदित्य बिर्ला’, ‘जिओ’ व ‘आयडिया’ याही काही पेयमेंट बँका सुरू झाल्या. मात्र सर्वात बँकिंग क्षेत्रात सर्वात मोठी क्रांती घडवू शकेल अशी पेयमेंट बँक म्हणजे भारतीय डाक खात्याच्या मालकीची IPPB म्हणजेच ‘इंडियन पोस्ट पेयमेंट बँक’.

भारतीय पोस्ट पूर्वीपासूनच विविध बँकिंग व विमा सेवा पुरवते, शिवाय लवकरच ‘आयडीबीआय बँक’ खरेदी करून प्रत्यक्ष बँकिंग क्षेत्रातही पदार्पण करेल. देशभर विस्तारलेलं जगातील सर्वात मोठं पोस्टचं जाळ ‘भारतीय पोस्ट’कडे आहे. या सगळ्याच्या पार्श्वभूमीवर उशिरा पदार्पण करूनही IPPB ही ‘एअरटेल’ व ‘पेटीएम’च्या पेयमेंट बँकांना मागे टाकेल.

## घरपोच सेवा

‘इंडियन पोस्ट पेयमेंट बँके’त खाते काढण्यासाठी आपल्याला कुठेही जावं लागणार नाही तर घरच्या घरी IPPB हे ॲप डाउनलोड करून आपण शून्य बॅलन्स बँक खाते उघडू शकतो. दुसरा पर्याय म्हणजे पोस्टाने आपल्या पोस्टमन किंवा ग्रामीण डाकसेवकांकडे ही बँक खाती उघडण्यासाठी विशेष फोन दिले आहेत, ज्याद्वारे आपण फक्त आधार कार्डद्वारे बँक खाते काढू शकतो.

## बचत व चालू खाते

'IPPB', ‘एअरटेल’, ‘पेटीएम’, ‘फिनो’ व ‘आदित्य बिर्ला’ या पाचही कार्यान्वित बँकेत आपण बचत खाते सुरू करू शकतो. यातील ‘फिनो पेयमेंट बँके’त खाते

उघडण्यासाठी ₹१,००० बॅलन्स ठेवण्याची अट आहे. ‘फिनो’व्यतिरिक्त चारही बँकांमध्ये शून्य बॅलन्स बचत खाते काढण्याची सोय आहे.



‘पेटीएम पेयमेंट बँके’त चालू खाते काढण्यासाठी ऑनलाइन अर्ज भरावा लागतो. त्यानंतर बँकेतून आपल्याला संपर्क करून खाते काढून दिले जाते. मात्र काही काळापासून रिझर्व्ह बँकेने निर्बंध घातल्यामुळे ‘पेटीएम पेयमेंट बँके’त बचत व चालू दोन्ही खाती उघडण्यावर बंदी आहे.

लघुउद्योजक व छोटे व्यापारी यांना व्यवसायाच्या नावे चालू खाते काढण्यासाठी बँक खाते काढण्यासाठी ‘इंडियन पोस्ट पेयमेंट बँक’ हा उत्तम पर्याय आहे. या खात्यात महिन्याला ₹१,००० किमान बॅलन्स ठेवावा लागेल. IPPB मध्ये हे चालू खाते हे बचत खात्याप्रमाणेच ऑनलाइन ॲपद्वारे किंवा पोस्टमनच्या माध्यमातून काढण्याची सोय आहे.

## डिजिटल पेयमेंट्सची सोय

‘डिजिटल इंडिया’ मोहिनेअंतर्गत सध्या देशात डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन दिले जात आहे. मात्र छोटे व्यापारी व लघुउद्योजक यांना डिजिटल व्यवहार स्वीकारण्यास अनेक अडचणी येतात. यावर IPPB ने उपाय शोधला आहे.

तुम्ही IPPB मध्ये चालू खाते सुरू केल्यानंतर छोटे उद्योजक व व्यापाऱ्यांसाठी तयार केलेले ‘मर्चंट ॲप’वर रजिस्टर होऊन आपल्या दुकानात किंवा कार्यालयात IPPB चा QR कोड लावून त्याद्वारे डिजिटल पेयमेंट स्वीकारू शकता. ‘मर्चंट ॲप’वर स्वीकारलेले पैसे त्वरीत आपल्या चालू खात्यात जमा होतील.

'IPPB', ‘एअरटेल’, ‘पेटीएम’ किंवा ‘आदित्य बिर्ला’ या पाचपैकी कोणत्याही पेयमेंट बँकेद्वारे शून्य बॅलन्स बचत किंवा चालू खाते काढून आपण बँकिंग क्षेत्राचा भाग होऊ शकता.

**- शैलेश राजपूत**
९७७३३०१२९२

*(लेखक ‘स्मार्ट उद्योजक’चे संपादक आहेत.)*

# PROSPERO

## Financial Planning & Wealth Management

+ Comprehensive Financial Planning
+ Specific Goal Oriented Planning
+ Wealth Management Advisory
+ Wealth Protection Planning
+ Emergency Fund Planning
+ Estate Planning
+ Cash Flow Budgeting and Planning

Contact

**Archana Bhingarde**

022-24326861 / 24316897

9821172117



# तुझ्या हाती सुवर्णाचे चढावे मोल मातीला

*तुझ्या हाती सुवर्णाचे चढावे मोल मातीला,*
*हिऱ्याचे तेजही तैसे चढावे गारगोटीला ।*
*विषारी तीक्ष्ण काट्यांची तुझ्या स्पर्शे फुले होती,*
*ग्रहांचे साह्य शूराला यशश्री पायीची दासी ।।*

अशी कवी यशवंत यांची एक कविता आहे. काही उद्योजकांच्या

मुलाखती घेताना ती कविता जणू मूर्तीमंत स्वरूप घेऊन साकार झालेली दिसते. बोरीवलीच्या 'भागिरथी ट्रान्स कॉर्पो'चे संस्थापक संचालक मनोहर गोविंद सकपाळ हे अशाच विरळा उद्योजकांपैकी एक. ज्या परिस्थितीतून त्यांनी आपल्या उद्योगगंगोत्रीची सुरुवात केली आणि आज तिने धारण केलेले विशाल स्वरुप पाहून आश्चर्याने थक्क व्हायला होते. या विस्तारामागे उभ्या असलेल्या मनोहर सकपाळ या भगीरथाविषयी जाणून घ्यायला मन उत्सुक होते.

वास्तविक उद्योग-व्यवसायाची कोणतीही पार्श्वभूमी मनोहर सकपाळ यांना लाभलेली नाही. त्यांचे वडील गोविंद हे मराठा रेजिमेंटमध्ये सैनिक होते. दुसऱ्या महायुद्धातील कामगिरीबद्दल ब्रिटीश सरकारने त्यांचा गौरव केला होता. निवृत्तीनंतर त्यांनी बोरीवलीतील केबल कॉर्पोरेशनमध्ये सुरक्षारक्षकाची नोकरी पत्करली. अशा कुटुंबात १६ मार्च १९६५ रोजी मनोहर यांचा जन्म झाला. पाच भावंडांच्या कुटुंबात परिस्थितीचे चटके त्यांना सोसावे लागले. मुंबई महापालिकेच्या शाळेत ते शिकले. तेव्हा करिअरचे फारसे ऑप्शन्स नव्हते. मॅट्रिकनंतर त्यांनी बारावीचे शिक्षण व नंतर आयटीआयमधून बॉयलर अटेंडंटचा कोर्स केला. हा कोर्स करीत असतानाच घराला आधार देण्यासाठी ते पार्ट टाईम दुसऱ्याची रिक्षा चालवायचे. येथेच त्यांच्या मनात व्यवसायाचे बीज रुजले.

त्यांनी स्वत:ची रिक्षा घेतली. पुढे अजून एक रिक्षा घेतली. मालवाहू टेंपोही घेतला. ते रोज मुंबई-गोवा अशी मालवाहतूक करू लागले. पुढे एका टेंपोचे त्यांनी दोन टेंपो केले. नंतर प्रवासी बस घेतली व मुंबई-चिपळूण डेली बससेवा सुरू केली. तिला उत्तम प्रतिसाद लाभू लागला. दरम्यान त्यांचे लग्न झाले. मराठी मानसिकतेनुसार घरच्यांच्या आग्रहाखातर त्यांनी केबल कॉर्पोरेशनमध्ये तेरा वर्षे नोकरी केली. तेव्हा ते सुटीच्या दिवशी बस चालवायचेच.

एक दिवस नोकरीला रामराम ठोकून ते पूर्णवेळ व्यवसायात उतरले. प्रवासी वाहतूक, बससेवा या व्यवसायाचा त्यांना चांगलाच अनुभव त्यांच्या गाठीशी जमा झाला होता. त्या ज्ञानाच्या व अनुभवाच्या आधारेच त्यांनी आपल्या उद्योगविश्वाचा विस्तार केला.

कोकण रेल्वे सुरू झाल्यावर त्यांच्या प्रवासी बससेवेच्या व्यवसायात मंदी आली. या संकटाला संधी समजून त्यांनी आपल्या उद्योगाचा रोख बदलला. त्याच दरम्यान बीपीओ-कॉलसेंटर्सचे पर्व सुरू झाले होते. शासकीय नियमांनुसार बीपीओंना आपल्या कर्मचार्यांना बसने नेण्या-आणण्याची सोय करावी लागते. २००१च्या दरम्यान त्यांनी या नव्या व्यावसायिक दालनात पाऊल टाकले. ग्राहकांना सर्वोत्तम सेवा द्यायची या त्यांच्या धोरणानुसार त्यांनी भगिरथी ट्रान्स कॉर्पो प्रा. लि. या नावाने असंख्य कॉलसेंटर्सना बस आणि कार सेवा देण्यास सुरुवात केली. नंतर त्यांनी कधी मागे वळून बघितलेच नाही. आजमितीला त्यांच्याकडे ६०० हून अधिक बसेस व ३५० पेक्षा जास्त कार आहेत.

निरनिराळ्या महापालिका आपल्या नागरिकांना बससेवा पुरवतात. मात्र त्या महापालिकेतर्फेच चालवल्या जातात. २०१२ साली वसई-विरार या महापालिकेने अशा तर्हेची सेवा खाजगी कंत्राटदारामार्फत सुरू करण्याचा निर्णय घेतला. अशा तर्हेचा प्रयोग करणारी ती देशातील पहिली महापालिका होती व वर्षभराच्या कडक छाननीनंतर हे काम भगिरथी ट्रान्सकॉर्पोला मिळाले. आजमितीला भगिरथी ट्रान्स कॉर्पोच्या तिथे १५० बसेस चालतात व १ लाख प्रवासी त्याचा लाभ घेतात. भगिरथीतर्फे प्रवाशांना मोफत वाय-फाय, एफएम, डायलिसीसच्या रुग्णांसाठी सवलत वगैरे अनेक सुविधा पुरवल्या जातात. याच्याही पुढे महाराष्ट्र शासनाच्या शिवशाही बसेसदेखील भगिरथीतर्फे चालवल्या जातात. आज भगिरथीचा टर्नओव्हर १०० कोटींच्या पुढे आहे.


Unique Marketing Services
Solution for Online Promotion
Creating Facebook page
Facebook Marketing
Operating Facebook Shop
Facebook/ Whatsapp Banners
Facebook page Analyzing
Email Marketing
and many more........
f
G+
in
Unique Marketing Services
Mobile: 9322403088
Email: umsdadar@gmail.com
www.uniquemarketingindia.com
Be Online, Stay Online

मनोहर सकपाळ हे सामाजिक जाणीव जपणारे उद्योजक आहेत. आपले मूळ गाव रत्नागिरीच्या खेड तालुक्यातील साखर येथे त्यांनी ग्रामविकासाची खूप कामे केली आहेत. बंधारे, शेततळी बांधली आहेत. शेवगा लागवड, जलशिवार योजनेअंतर्गत गावात आता रोजगार निर्माण होऊन गावातून बाहेर गेलेले तरुण आता गावाकडे परतू लागलेत. वसिष्ठ ॲग्रो न्युट्री प्रॉडक्टस् प्रा. लि. ही कंपनी स्थापन करून त्यांनी ग्रामोन्नतीच्या विविध योजना आखल्या आहेत.

मनोहर सकपाळ यांनी कोणतीही पार्श्वभूमी नसताना शुन्यातून विश्व निर्माण केले. त्यात त्यांच्या पत्नी मनाली यांचा मोलाची साथ आहे. त्यांची पुढली पिढी आता सीय झाली आहे. पुत्र सागर वेलिंगकर इन्स्टूटुटमधून फॅमिली बिझनेस या विषयात पीजी डिप्लोमा करून व मुलगी सायली सकपाळ भगिरथीची धुरा सांभाळत आहे. फिशरीज क्षेत्रातील तज्ज्ञ असलेला त्यांचा पुतण्या रुपेश याने भगिरथीच्या कार्यालयाशेजारी टनेल इफेक्ट सीफूड स्पेशवाचा मनोहर सकपाळ यांचा प्रेरणादायी प्रवासल रेस्टॉरंट सुरू केले आहे. या सगळ्या विस्तारामागे मनोहरजी सकपाळ यांची व्यावसायिक दृष्टी आणि प्रेरणा आहे.

मुलाखत : **प्रशांत असलेकर**
(पॅसिफिक मीडिया सर्व्हिसेस)
संपर्क : **मनोहर सकपाळ -**
९००४६०८४०१, ०२२-२८९७९८९८

# बी.एम.एम. विद्यार्थ्यांच्या कलेचे प्रदर्शन करणारा 'कटिंग चाय'

दर वर्षी आर. डी. नॅशनल कॉलेजच्या बी.एम.एम. डिपार्टमेंटतर्फे 'कटिंग चाय' नावाचा उत्सव समारंभ आयोजित केला जातो. सगळ्या विद्यार्थ्यांसाठी हा फक्त एक उत्सव नव्हे तर स्वतःच्या कलेचे प्रदर्शन करण्यासाठी सुवर्णसंधी असते. या उत्सवात मुंबईच्या कानाकोपऱ्यातून जवळपास २२ बी.एम.एम. क्षेत्राचे महाविद्यालय सहभागी होतात.

नॅशनल कॉलेजच्या बी.एम.एम. क्षेत्रातील सर्वात जुने उत्सवपर्व असल्यामुळे सगळे विद्यार्थी या 'कटिंग चाय'ची आतुरतेने वाट पाहत असतात. हे पर्व सगळ्या विद्यार्थ्यांसाठी एक शिक्षणाचे माध्यम आहे. तीन दिवसांच्या या उत्सवात मुले जे काहीही शिकतात, ते सर्व त्यांच्या व्यावहारिक व प्राथमिक जीवनात खूप कामी येते. मित्रांसोबत तीन दिवसांची मजा, नवीन लोकांना भेटणे हे सगळे या लोकांच्या मनात एक आठवण म्हणून आयुष्यभर राहते. मोठ-मोठ्या अभिनेत्रींची उपस्थिती या रंगमंचाला नवीन झलक व उत्साहाचा तडका लावते.

दर वर्षाची या पर्वाची एक थीम असते. दर वेळी ती बदलत जाते आणि प्रत्येक वेळी विद्यार्थी एक नवीन आयडिया घेऊन वर येतात. 'कटिंग चाय' सुरू होण्यास आता फक्त एक महिना राहिला आहे. बी.एम.एम. विद्यार्थी आतुरतेने वाट पाहत आहेत, यात सहभागी होण्यासाठी. मजेदार, चटकेदार रहस्याने भरलेला, आनंदाने भरपूर 'कटिंग चाय' लवकरच येत आहे.


Youth for Democracy
Swadeshi e-Mandai
Swadeshi e-Mandai
Vendor Digitisation Workshop
पुरोगामी उद्योजकांसाठी
Free
खालील विषयांवर मार्गदर्शन
ऑनलाईन विक्री कशी करावी
ऑनलाईन स्टोअर कसे तयार करावे
ऑनलाईन ब्रँडिंग कशी करावी
प्रोडक्ट फोटोग्राफी कशी करावी
या कार्यक्रमाला कोणी यावे?
सूक्ष्म आणि लघु उद्योजक, महिला उद्योजक, युवा उद्योजक, गृहोद्योजक, सेवाभावी संस्था
रविवार, १३ जानेवारी २०१९, संध्याकाळी ५ वाजता.
प्रज्ञा बोधिनी हायस्कूल, गोरेगाव (पूर्व), मुंबई.
संपर्क व नोंदणी
9594040068, 8433760752
www.emandai.in

# 'ई-मंडई'वर विक्रेते व्हा आणि आपली उत्पादने विका!

सध्या भारत हा एक विकसनशील देश म्हणून नाही, तर जागतिक बाजारपेठेतील एक बलाढ्य स्पर्धक म्हणून ओळखला जातो. हे जाणून विदेशी उत्पादकांनी आणि गुंतवणूकदारांनी, कमी किंमतीत जास्त उत्पादने उपलब्ध करून अतिशय कौशल्याने भारतीय बाजारपेठेवर वर्चस्व प्रस्थापित केले आहे. यामुळे पुरेशी संधी न मिळाल्याने भारतीय उद्योजकांनी तयार केलेल्या उत्तम दर्जाच्या वस्तू डावलल्या जातात.

यावर तोडगा म्हणून सुरू झालेली चळवळ म्हणजे 'युथ फॉर डेमोक्रसी' या स्वयंसेवी संस्थेने सुरू केलेली 'स्वदेशी मंडई'. स्वदेशी का विकत घ्यावे इथपासून स्वदेशी कसे/कुठे विकत घ्यावे याचा मार्ग.

नवोदित उद्योजकांना सहकार्य करणे आणि त्यांना प्रोत्साहन देणे हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी ही संस्था प्रयत्नशील आहे.

त्या धर्तीवर सुरू केलेली 'ई-मंडई' ही ऑनलाईन वेबसाईट लघू आणि सूक्ष्म उद्योजक, महिला उद्योजक, बचत गट आणि सामाजिक संस्था यांनी बनवलेल्या उत्पादनांची विक्री करण्यास साहाय्य करते. याद्वारे स्वदेशीचा पुरस्कार केला जातो, भारतीय उद्योजकांना माफक दरात उत्पादने विकण्याची संधी मिळते आणि सभोवतालच्या अनेक लघुद्योगांना नवीन बाजारपेठ मिळवून देण्याचाही प्रयत्न केला जातो.

ग्राहकाला दैनंदिन जीवनात आवश्यक असणाऱ्या गोष्टी, अगदी घरात बनणाऱ्या लसूण चटणीपासून ते बचतगटात बनणाऱ्या फराळापर्यंत, हाताने विणलेल्या तोरणांपासून ते कारखान्यात बनवलेल्या विद्युतमाळांपर्यंत, घरात

बनणाऱ्या चॉकलेट आणि केकपासुन ते परफ्यूम आणि शोभिवंत दागिन्यांपर्यंत सारे काही स्वदेशी 'ई-मंडई'वर विकले जाते.

या वेबसाईटवर उपलब्ध असलेल्या सर्व वस्तू/सेवा आपल्या आसपास असणाऱ्या स्थानिक उद्योजक, स्वतंत्र महिला उद्योजक, महिला बचत गट आणि सामाजिक कार्याला वाहून घेतलेल्या स्वयंसेवी संस्था यांनी तयार केलेल्या आहेत.

स्वदेशी 'ई-मंडई' हे ऑनलाईन वेबसाईटद्वारे स्थानिक उत्पादनांची विक्री करण्याचे माध्यम तर आहेच, पण ते उद्योजकता विकासाचा एक भागही आहे.

प्रत्येक व्यक्ती, मग ती लहान असो वा मोठी, अनुभवी असो वा नव्या दमाची, प्रबळ इच्छा, हातात कौशल्य आणि त्याचे व्यवसायात रूपांतर होण्याचे स्वप्न मनाशी बाळगणार्या प्रत्येक माणसासाठी ही सुवर्णसंधी आहे.

'ई-मंडई'वर विक्रेता नोंदणीची प्रक्रिया :

* नोंदणी पत्रक भरा.

* आपल्या उत्पादनांची माहिती आमच्याकडे द्या किंवा आपल्या खात्याद्वारे उत्पादने अपलोड करा.

* वेबसाईटच्या आवश्यकतेनुसार आपल्या उत्पादनांचे फोटो आम्हला पाठवा किंवा आपल्या खात्याद्वारे उत्पादन फोटो अपलोड करा.

स्वदेशी 'ई-मंडई'चे विक्रेता धोरण खालील लिंकवर वाचता येईल.

https://emandai.in/vendor-policy/

खालील लिंकवर जाऊन आपण स्वदेशी 'ई-मंडई'वर विक्रेता म्हणून नोंदणी करू शकता.

https://emandai.in/vendor-membership/

संपर्क : **९५९४०४००६८, ८४३३७६०७५२**

# Udyogssanjivani Corporate Consultancy Services LLP

*If you want to climb, allow us to be your ladder.*

१. व्यवसायाचे स्वरूप कसे असावे?

२. तुमचा कल कोणत्या व्यवसायाकडे आहे?

३. व्यवसाय कधी सुरू करावा?

४. व्यवसाय भागीदारीत सुरू करावा का?

५. व्यवसायाचे नाव ठरवताना कोणती काळजी घ्यावी?

६. तुमच्या व्यवसायासाठी योग्य दिशा कोणती?

७. व्यवसायाची जागा निवडताना कोणती काळजी घ्यावी?

८. व्यावसायिक अडचणींतून मार्ग काढण्यासाठी काय करावे?

९. व्यावसायिक समृद्धीसाठी काय करावे?

## संपर्क : ८०८०२४४४१२

## Dr Nikkkhil D Dolass

Ayurved | Astrology | Numerology | Palmistry
Vastu | Tarot Cards | Reiki | Dowsing

www.udyogssanjivani.com

# स्मार्ट उद्योजक क्लासिफाइड्स

जाहिरात छोटी, परिणाम मोठा...

## उद्योगसंधी

### स्मार्ट उद्योजक

'स्मार्ट उद्योजक'चे ॲफिलेट होऊन घरबसल्या ऑनलाइन काम करून पैसे कमवू शकता. जोडधंदा म्हणून करण्यास उत्तम पर्याय. नोंदणी शुल्क : ₹१०० । संपर्क : ९७७३३०१२९२

### एलआयसी एजंटला दरमला ८४,००० पगार

विश्वास नाही ना बसत? मग लगेच संपर्क करा राजेश जाधव यांना. एलआयसी अधिकारी - ८७७९६४८८८६, ९८२१५९६०६१

### वितरक नेमणे आहे

अमरावती, अकोला, वाशिम, यवतमाळ, नागपूर जिल्ह्यात लोणच्याचे वितरक नेमणे आहेत. आमच्याकडे विविध प्रकारची लोणची उपलब्ध. प्रतिमा तायडे : ९०९६९९४१९६, ९८६०६७४४७४

### केशर वेलची सिरपसाठी वितरक

'स्वाद केशर वेलची सिरप'साठी महाराष्ट्रातील सर्व प्रमुख शहरांमध्ये वितरक नेमणे आहे. संपर्क : ९४२०५२८९९१

### तृप्ती पापड गृहोद्योग

उडीद, मुग पापड, नागोली पापड, तांदूळ पापड, खारोड्या, कुरोड्या, मुंगवड्या, फराळी पापड आदी मिळतील. महाराष्ट्रभर वितरक नेमणे आहेत. विमल राजगुरू : ९९२३५७७२३४, ७६२०१५७१०९

### सॉफ्टवेअर क्षेत्रात लाखो कमावण्याची संधी

आमच्यासोबत सुरू करा स्वत:चा नवीन व्यवसाय आणि महिना १ ते १.५ लाख कमवा. संपर्क : ८०५५५१४३६८, ७२६२०६५७३५

## प्रशिक्षण

### Master Minds

12+ years experience in training. Corporate Training, Personal Coaching, Customized training as per your need. www.master-minds.in Contact: 9604588276, 8806901547

## आरोग्य

### अदिती होमिओ क्लिनिक

सायनस, टॉन्सिल्स, मायग्रेन सर्दी, मणके व सांध्यांचे विकार, केस गळणे व्यंध्यत्व, स्त्रियांचे सर्व आजार, त्वचेचे आजार, दमा, अस्थमा अशा अनेक प्रकारच्या इतरही सर्व आजारांवर होमिओपॅथी औषधांनी कायमस्वरुपी इलाज.

**डॉ. लीना भापकर** : ९७०२२४००७७

### योगवर्ग

आमच्याकडे सर्व वयोगटातील व्यक्तींसाठी योगवर्ग शिकवले जातात व फक्त

# स्मार्ट उद्योजक क्लासिफाइड्स

जाहिरात छोटी, परिणाम मोठा...

पुरुषांसाठी मसाज थेरपी उपलब्ध आहे. संपर्क : आशिष मसुरकर ९८६७३६३१११, ८७७९०७४०२८

## पर्यटन

दिवेआगर (कोकण) येथे घरगुती शुद्ध शाकाहारी भोजनाची व निवासाची उत्तम व्यवस्था. अनिकेत सहस्रबुद्धे - ८८८८१५०६१७, ०२१४७-२२४४७८

**Angel World**

Make your Holiday Story.

Welcome to Short Long Destinations

For more details: 9833479891, 9833421266

## ज्योतिष

सर्व व्यवसायांसाठी उपयुक्त 'व्यापारवृद्धी यंत्र' अधिक माहितीसाठी फेसबुक पेजला भेट द्या.

facebook.com/Pankaj.mantri.79

पंकज मंत्री : ९२८४१७३७०५

## विविधा

**धनलक्ष्मी कृषी सेवा केंद्र**

आमच्याकडे सर्व प्रकारचे बी-बियाणे, रासायनिक खते, औषधे योग्य दरात मिळतील. दिंद्रुड, ता. माजलगाव, जि. बीड. मालक : अतुल सो. कुलकर्णी - ९७६४६५०९०३, ९५२७६४७०७२

**श्री सर्व्हिस : डिझेल गाड्यांसाठी सेवा**

पिकअप कमी मिळणे, गाडी स्टार्ट न होणे, गाडी उशिरा स्टार्ट होणे, काळा धूर जास्त येणे, डिझेल इनजेक्टर सर्व्हिस. निलेशसिंह - ९७६७४१६१०२

**Naveed Agency**

Distributors of Gold-Fingures, Wheel, Ponga, Ring, ABCD, Microny Papad, Wafer, Nalli, All types of papad and kurkure. Location: Solapur.

Contact: 9860848069, 9860686549

**OVI Corpotation**

Structure Industrial Fabrications, CNC & VMC Machining job work. All type of Conveyors and Press components. Ambad, Nashik. Contact - 99236 28974

**Amedi Greens : Farming Natural Foods**

जात्यावर दळलेली हळद, लाकडी घाण्याची शुद्ध तेलं व इतर उत्पादने उपलब्ध.

संपर्क : ७६२०६९०२३१, ७९७२०९९९७२

**श्री सिद्धनाथ एंटरप्राइजेस**

कॅमल, नटराज, अप्सरा, कांगारू तसेच हॉस्पिटल, इंडस्ट्रीज, कॉलेज आदी ठिकाणी लागणारे स्टॅपलर व पीनचे व ऑफिस स्टेशनरी मालाचे होलसेल विक्रेते.

# स्मार्ट उद्योजक क्लासिफाइड्स

जाहिरात छोटी, परिणाम मोठा...

सुहास नाईक : ९६६५३७०४९८

***Socho Zara Hatke***

Is your child cofused about how to study concepts of science? Then you are at right place. Contact - 9768688125, 9699606400

**Point Scale Survey Co. (Land Surveyor)**

Physical Survey, Internal Survey, Demarcation, Leveling, Contour Survey, Hutment Survey. Pratik Raut : 8983315922

**Smart Start**

It is a unique Platform where people can find New Startups, Investors, Its Low Subscription for Everybody. Sameer Bhattad 9373450755

**NRM Fisheries**

**ताजे मासे** : पापलेट, सुरमई, रावस, बांगडा, कोळंबी, खेकडे **सुके मासे** : कोळंबीचे सोडे, कोलीम, करंदी, बोंबिल, बांगडा **राजेंद्र पड्याळ** : ८४२५८१७०२३, ७८७५५५८२२६

**पूनम खैरनार : समुपदेशक**

विवाह समुपदेशन, मुलांचे समुपदेशन, करिअर समुपदेशन, लैगिंक शिक्षण समुपदेशन, वैद्यकीय समुपदेशन. संपर्क : ९००४८७४९३

**धनाज् पैठणी**

पर्स, कुर्ती, जॅकेट्स व ॲक्सेसरीज्. भरपूर व्हरायटी व स्टॉक, नवनवीन डिझाइन्स. समारंभात भेट देण्यासाठी होलसेल दरात पैठणी पर्सेस उपलब्ध. संपर्क : ७२७६२८२७२०, ९७३००६५१२४

**Mayuri Collection**

Manufacturer of Bra, Panties & Fancy Nighty (Gown). Location: Diva, Thane. Contact - 8976375876, 8369038303.

## वित्त / आर्थिक

**अर्थमित्र गुंतवणूक सल्लागार**

आजकाल पैसा सर्वांकडे आहे, पण तुम्हाला माहीत आहे का? तुमचा पैसा म्हणजे तुमची संपत्ती नाही, तुमचे पैसे तुमची संपत्ती होण्यासाठी त्यावर गुंतवणूकीचे संस्कार व्हायला हवेत. संपर्क : मोरेश्वर जोशी - ८६९८९५८५५५

**स्मार्ट उद्योजक क्लासिफाइड्स**
जाहिरात छोटी, परिणाम मोठा...

**'स्मार्ट उद्योजक क्लासिफाइड'मध्ये जाहिरात देण्यासाठी संपर्क**

**९७७३३०१२९२**

**जाहिरात दर**

१ महिना : ₹१२०/-  ३ महिने : ₹३२४/-
६ महिने : ₹५७६/-  १२ महिने : ₹८६४/-




# डबे पुरविणे

शहरी व निमशहरी भागांत नोकरी, व्यवसाय, शिक्षण यानिमित्ताने लोक येत असतात. अनोळखी शहरात एकट्याने राहताना जेवणाची गैरसोय होत असते. अशा वेळी आपल्या राहण्याच्या ठिकाणापासून जवळपास जेवणाची व्यवस्था कोठे होईल याची चाचपणी लोक करत असतात. घरापासून दूर असल्यावर घरच्या जेवणाची चव हवी असते. त्यामुळे हॉटेलचे खाणे टाळले जाते.

शहरी व निमशहरी भागांत अशा प्रकारे एकटे राहणाऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. कामाच्या अनिश्चित वेळा असल्यामुळे लोक घरपोच जेवणाचा डबा मिळेल का अशा सर्व्हिसच्या शोधात असतात, त्यामुळे जेवणाचे डबे पुरवणे हा एक चांगला व्यवसाय होऊ शकतो.

आपली नोकरी व व्यवसाय सांभाळून गृहोद्योग करण्यासाठी हा एक चांगला पर्याय आहे. स्वयंपाकाची आवड असणारे किंवा गृहिणी हा व्यवसाय यशस्वीपणे करू शकतात. कमीत कमी आर्थिक गुंतवणूक करून हा पूरक उद्योग सुरू करू शकतो. सुरुवातीला वेळेची गुंतवणूक व मनुष्यबळही कमी लागते.

शाकाहारी व मांसाहारी अशा दोन्ही स्वरूपांत मागणीनुसार तुम्ही सेवा देऊ शकता.

कोणत्याही प्रकारच्या शिक्षणाची अट नाही, परंतु स्वयंपाक करण्याची

आवड, अंगमेहनतीची तयारी आणि वेळेचे नियोजन या गोष्टी आवश्यक आहेत. माहितीतल्या म्हणजेच शेजारी, नातेवाईक इत्यादींच्या ओळखीतून तुमच्या व्यवसायाला ग्राहक मिळवू शकता. जेवणाची चव आणि जेवणाची वेळ या दोन गोष्टी सांभाळल्या म्हणजे ग्राहकाचे समाधान होते आणि तो तुमचा खात्रीचा ग्राहक होतो.

हळूहळू डब्यांची संख्या वाढवत, जेवणाची चव व जेवणाचा मेनू यात नावीन्य जपत तुम्ही व्यवसाय वाढवू शकता. सुरुवातीला डबे पोहोचविण्यासाठी एखादा गरजू मुलगाही हाताशी धरू शकता आणि हळूहळू व्यवसायात वाढ होईल तसे कर्मचारीही वाढवू शकता.

# रबरी शिक्के बनविणे

रबरी शिक्के म्हणजेच रबर स्टॅम्प ही प्रत्येक व्यवसायात लागणारी आवश्यक बाब आहे. छोट्यामोठ्या दुकानांपासून ते कार्यालयां त्याचा वापर होतो. सरकारी कार्यालये, खासगी उद्योगसमूह, बँका, डाकघरे यांसारख्या अनेक ठिकाणी रबरी शिक्क्यांचा वापर केला जातो. व्यवसाय उद्योग वाढत जात आहेत, त्या प्रमाणात दिवसेंदिवस या रबरी शिक्क्यांना मागणीसुद्धा वाढत आहे.



कागदपत्रे/दस्तऐवज कोणाचे आहे हे लगेच ओळखू यावे यासाठी रबर स्टॅम्प्सचा मुख्य:त्वे उपयोग होतो. ग्रामीण भागात सरकारी खाती, लघुउद्योग, वकील,

डॉक्टर्स, व्यक्तिगत उपयोग करणारे या सर्वांकडून रबरी शिक्क्यांना मागणी भरपूर प्रमाणात आहे.

रबरी शिक्के बनविण्यासाठी छापखान्यात वापरतात त्या अक्षरांच्या खिळ्यांचा वापर करून प्लॅस्टर ऑफ पॅरिसमध्ये साचे बनविले जातात. या साच्यावर रबराचे शीट ठेवून ते हॅण्ड प्लाय प्रेसखाली, खालच्या बाजूने उष्णता देऊन दाबले जाते. रबर वितळते आणि त्याला साच्याचा आकार येतो. हे रबर साच्यातून काढून, योग्य तऱ्हेने कापून लाकडाच्या ठोकळ्यावर पक्के बसविले जाते. शिक्का मारताना बरोबर बाजू कळावी म्हणून ठोकळ्यावर पितळेची रिंग बसविली जाते. साधारण एकटा माणूसही हे काम करू शकतो. या व्यवसायात एकूण खर्चाच्या साधारण दुप्पट नफा मिळतो.

# मार्केटिंग व प्रमोशन एजन्सी

मार्केटिंग ही प्रत्येक उद्योगाची लाइफलाइन असते, कारण मार्केटिंगमुळेच विक्रीत वाढ होते व कंपनीची उलाढाल वाढते. त्यामुळे प्रत्येक कंपनीला, मग ती उत्पादन करणारी असोत वा सेवा पुरवणारी, आपला व्यवसाय वाढवण्यासाठी मार्केटिंग ही बाब अनिवार्यच आहे. मात्र प्रत्येक व्यवसायाला ती यशस्वीरीत्या करता येतेच असे नाही. त्यामुळे अशा कंपन्यांची वाढ होत नाही.

मार्केटिंगचा अभाव असलेल्या अशा अनेक छोट्या कंपन्या आपले मार्केटिंग करण्यासाठी मार्केटिंग एजन्सींच्या शोधात असतात. त्यामुळे तालुका, जिल्हा वा राज्यव्यापी मार्केटिंग व प्रमोशन करेल अशी एजन्सी आपल्याला सुरू करता येऊ शकते. एखाद्या उत्पादन वा सेवेचे आपण आपल्या तालुका पातळीवर प्रमोशन करू शकता. आता डिजीटल माध्यमातूनही कमी खर्चात मार्केटिंग करता येऊ शकते. निम्नशहरी भागात शिकावू तरुणांना हाताशी घेऊन मार्केटिंग एजन्सी सुरू करणे त्यांच्याही हिताचे ठरू शकेल.


मे. शाह बाबुलाल मुळचंद,
युनिफॉर्मचे निर्माते,
सादर करत आहेत...
कॉर्पोरेट युनिफॉर्म
* तुमच्या आवडत्या रंगात,
* आकर्षक डिझाइनमध्ये
* तुमच्या लोगोसह
* आकर्षक किंमतीत
टेलरमेड, कॉर्पोरेट युनिफॉर्म
करणारे एकमेव नाव
मे. शाह बाबुलाल मुळचंद
९९२२४६४८४७




# वेबसाइट : स्मार्ट उद्योजकाची गरज

वेबसाइट ही आज प्रत्येक उद्योजकाची गरज झाली आहे. त्याची अनेक कारणं आहेत. माहिती तंत्रज्ञानामुळे जग खूप जवळ आलं आहे आणि त्यामुळे प्रचंड स्पर्धाही वाढली आहे. आपलं प्रॉडक्ट, आपली सेवा, त्याची माहिती ही २४ तास लोकांसाठी उपलब्ध असेल तर उद्योगाला त्याचा फायदाच होतो.

अनेकांना प्रश्न पडतो की, वेबसाइट म्हणजे काय? याचं सोप्पं उत्तर द्यायचं झालं तर, पुस्तकात जशी वेगवेगळी पानं एकत्र केली जातात व ती एकत्र बांधून त्याचे पुस्तक तयार केले जाते तसेच अनेक वेबपेजस मिळून एक वेबसाइट बनवली जाते.

तुमच्या कंपनीविषयीची माहिती वेगवेगळ्या माध्यमांतून एकत्र जोडली जाते. मजकूर, चित्र, फोटो, आकर्षक रंगसंगती, ध्वनिफीत या सगळ्यांच्या एकत्रीकरणाने आकर्षक माहिती संकलक वेबसाइट तयार करता येते. तुमच्या कंपनीचं ते एक प्रकारे ब्रोशरच असते. उद्योजकाची गरज, त्याच्या कल्पना अणि

त्याच्याकडील उपलब्ध माहिती अशा अनेक गोष्टींचा विचार करता वेबसाइट ही अगदी एका वेबपेजपासून शेकडो वेबपेजेसची असू शकते.

आजच्या काळात इंटरनेट वापरणाऱ्यांची संख्या खूप मोठी आहे. जागतिकीकरणामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार खूप सोपा झाला आहे. उद्योजकाने या संधीचा फायदा घेऊन स्वतःचे जागतिक बाजारपेठेत दार उघडण्यासाठी २४x७ ऑफिस म्हणजे वेबसाइट. म्हणून प्रत्येक कंपनीची, उद्योजकाची वेबसाईट ही असायलाच हवी.

## वेबसाइटचे फायदे

**ग्राहक वाढ :** वेबसाइट जगभरातून कुठूनही, कोणीही, केव्हाही पाहू शकतं, त्यामुळे जर आपली वेबसाइट असेल, तर इतर राज्यांतून, देशांतूनही आपल्या उत्पादनाला ग्राहक मिळतो. त्यासाठी वेगळा खर्च करण्याची आवश्यकता नसते. वेबसाइट असण्याचा खूप मोठा फायदा म्हणजे आपण वेगवेगळ्या पातळ्यांवर पैशांची बचत करू शकतो. तुम्ही जेव्हा ऑनलाइन व्यवसाय करता त्या वेळी जास्त मनुष्यबळाची गरज लागत नाही. तसेच साधनसंपत्तीसुद्धा कमी लागते. तुम्ही तुमच्या ग्राहकाला सर्व गोष्टी एकाच जागी उपलब्ध करून देत असल्यामुळे इतर गोष्टींसाठी लागणारा खर्चही कमी होतो.

प्रिंट अथवा टेलिव्हिजनवर आपल्या उत्पादन अथवा सेवेची जाहिरात करायची असल्यास आपल्याला प्रत्येक ओळ अथवा सेकंदानुसार अमाप पैसे मोजावे लागतात. याउलट वेबसाइटवर अत्यल्प खर्चात तुम्हाला जाहिरात करता येते आणि तिचा प्रसारही अन्य माध्यमांपेक्षा जलद गतीने होतो.

इंटरनेट हे एक असं माध्यम आहे ज्याच्याद्वारे तुम्ही तुमची तुम्हाला हवी तशी इमेज तयार करू शकता. प्रोफेशनल वेबसाइट बनवून तुम्ही जास्तीत जास्त लोकांपर्यंत स्वतःची ब्रॅण्ड इमेज तयार करू शकता. तुमचा व्यवसाय किती छोटा आहे याच्याशी काहीच घेणेदेणे नसते जेव्हा तुम्ही वेबद्वारे स्वतः चाब ब्रॅण्ड तयार करता.

तुमच्या ग्राहकाला समाधानकारक सेवा देण्यासाठी वेबसाइट खूप मोठी




भूमिका पार पाडते. वेबसाइटच्या माध्यमाद्वारे तुम्ही ग्राहकाला तात्काळ ऑनलाइन मदत करू शकता. आपल्या उत्पादन अथवा सेवेविषयी ग्राहकांकडून सूचना, बदल, सुधारणा विषयक माहिती देऊ आणि घेऊ शकता.

तुम्ही रिअल इस्टेट एजंट आहात किंवा तुमचा बांधकाम व्यवसाय असेल अथवा ब्युटी पार्लर असेल तुम्ही तुमचं काम इतरांना पाहण्यासाठी तुमच्या वेबसाइटवर पोर्टफोलिओ तयार करू शकता. एखाद्याला तुमचे काम पाहायचे असेल तर तुमच्या वेबसाइटवर तो ग्राहक ते लगेच पाहू शकतो.